सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र
राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना
सहाय्यक अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- केव्हीबी-२०१८/प्र.क्र.६६/उद्योग-६.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५ एप्रिल, २०१८.

वाचा : १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/२०१८-१९/प्र.क्र.२३/प्रशासन-१, दि.०६/०४/२०१८.

२) अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे क्र. कार्यासन -९/रानिवि/५३१, १८ एप्रिल,२०१८ चे पत्र.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान), विधेयक, २०१८ महाराष्ट्र विधानमंडळाने मंजूर केले असून, सदर अधिनियमास अधिनियम २२ म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक २७/३/२०१८ मध्ये प्रसिध्द करण्यात आले असल्याचे उपरोक्त परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. तसेच सन २०१८-१९ या अर्थसंकल्पीय वर्षाकरीता अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या अनुदानातून ७०% अनुदान खर्च करण्यास मंजूरी देण्यात आलेली असून तितके अनुदान संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले असल्याचे उपरोक्त क्र. १ येथील शासन परिपत्रकान्वये सुचित करण्यात आले आहे.

२. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता ३१,सहायक अनुदान(वेतनेत्तर) रूपये २७८.८८ लक्ष रूपये ३६, सहायक अनुदान (वेतन) या उदिष्टाखाली रूपये ४९१६.१९/- असे एकूण ५१९५.०७/- लक्ष इतके अनुदान अर्थसंकल्पीत करण्यात आलेले आहे. या तरतूदीपैकी ७०% अनुदानाच्या मर्यादेत ३६, सहायक अनुदान (वेतन) या उदिष्टाखाली रूपये ३४,४१,३३,३००/- ३१,सहायक अनुदान (वेतनेत्तर) या उद्दिष्टाखाली रू.१,९५,२१,६००/- इतके अनुदान मंडळास उपलब्ध करून देण्यात आले आहे.

३. अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांनी त्यांच्या संदर्भ क्र. २ च्या पत्राव्दारे एप्रिल व मे २०१८ या दोन महिन्यांसाठी ३६ सहाय्यक अनुदान (वेतन) या उद्दिष्टाखालीरूपये ८१९.३६ लक्ष व ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या उद्दिष्टांसाठी रूपये ४६.४८ लक्ष असे एकूण ८६५.८४ इतके अनुदान उपलब्ध करून देण्याची विनंती केलेली आहे.मंडळाच्या उपरोक्त विनंतीनुसार रूपये ८६५.८४ (रूपये आठ कोटी पासष्ट लक्ष चौऱ्याऐंशी हजार फक्त) इतके अनुदान वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. यावरील खर्च मागणी क्रमांक के-७, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, १०५ खादी व ग्रामोद्योग (००) (०१) खादी व ग्रामोद्योग मंडळाला सहाय्यक अनुदान (दत्तमत) (२८५१ ०५८५) ३६, सहाय्यक अनुदान (वेतन) व ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या उद्दिष्टांखालील सन २०१८-१९ या अर्थसंकल्पीय वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर रक्कमेच्या आहरण व संवितरणाचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. सदर अनुदान खर्च झाल्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र मंडळाने शासनास व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना विहित कालावधीत सादर करावे. तसेच लेख्यांच्या खर्चमेळाबाबत महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांच्याकडून विचारणा करण्यात येईल, तेव्हा लेख्यासंबंधीची आवश्यक ती कागदपत्रे मंडळाने महालेखापाल कार्यालयास सादर करावीत.

६. सदर शासन निर्णय, शासन परिपत्रक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र. अर्थसं-२०१८/२०१८-१९/प्र.क्र.२३/प्रशासन-१, दि.०६/०४/२०१८ मधील निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२५१५४२०३६५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajiv Madhav Ambikar

Digitally signed by Rajiv Madhav Ambikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4afb47d807935092599a3e28024dd3d3c461bada30a950e81e666a02aad578f5, cn=Rajiv Madhav Ambikar
Date: 2018.04.25 15:43:34 +05'30'

(राजीव आंबीकर)
कार्यासन अधिकारी

प्रति :- माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई .
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
३. अर्थ सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. वरिष्ठ उप महालेखापाल (पडताळणी) बाह्य लेखा परीक्षा विभाग, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. लेखा अधिकारी, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई. (५ प्रती)
१०. कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१६/अर्थसंकल्प-१४/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई-३२.
११. कार्यासन अधिकारी (प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (उद्योग-६).